# विपश्यना

साधकांचे
मासिक प्रेरणा पत्र

बुद्धवर्ष २५५६, माघ पौर्णिमा, २५ फेब्रुवारी २०१३ वर्ष १ अंक 12

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकेसाठी पहा : http://www. vridhamma. org/Newsletter_Home. aspx

**धम्मवाणी**

**तपेन ब्रह्मचरियेन, संयमेन दमेन च।**
**एतेन ब्राह्मणो होति, एतं ब्राह्मणमुत्तमं'ति।।**

*-- (सुत्तनिपात ६६०, वासेट्ठसुत्तं)*

-- कोणीही साधक तप,ब्रम्हचर्य (धर्मसाधना), इंद्रियसंयम व चित्ताच्या दमनानेच 'ब्राम्हण' म्हणविण्याचा अधिकारी होतो. अशा साधकालाच 'उत्तम ब्राम्हण' म्हटले जाते.

## जन्माने नाही, कर्माने ब्राम्हण

एकदा भगवान इच्छानंगल वन-खण्डात विहार करीत होते. त्या वेळी तेथे अनेक प्रसिद्ध धनवान ब्राम्हणांचा निवास होता. त्यात पौष्करसाति व तारुक्ष नावाचे दोन प्रसिद्ध ब्राम्हण आचार्य होते. त्या दोघांचे वाशिष्ट व भारव्दाज नावाचे दोन शिष्य होते, ज्यांच्यात ह्या बाबीवर चर्चा सुरु झाली की ब्राम्हण कसा असतो?

भारद्वाजची ही मान्यता होती की कोणी मातेकडूनही आणि पित्याकडूनही सुजात असतो. त्याच्या आई वडील दोघांचेही सात पिढ्यांपर्यंतचे पूर्वज विशुद्ध वंशाचे असतात. त्यामुळे तो ब्राम्हण होतो. वाशिष्ट युवकाचे म्हणणे होते की कोणी शीलवान आणि व्रतसंपन्न असतो तेव्हाच तो ब्राम्हण होतो. जेव्हा दोघांच्या चर्चेतून सत्य निर्धारित झाले नाही तेव्हा ते भगवान बुद्धांजवळ पोहचले आणि आपला परिचय देऊन जातिवादाच्या विषयात जो विवाद होता की कोणी जन्माने ब्राम्हण होतो अथवा कर्माने- ह्याला समजविण्यासाठी त्यांना प्रार्थना केली.

भगवानांनी त्यांना सर्व प्राण्यांच्या जातिभेदाबाबत कारणासहित विस्ताराने सांगितले. सर्व प्राण्यांच्या जाती एक-दुसऱ्यांपासून वेगवेगळ्या आहेत. विभिन्न प्रकारच्या झुडपांच्या आणि गवतांच्या जाती एकदुसऱ्यांपासून भिन्न आहेत. कीट-पतंग आणि मुंग्यांच्या जातीचे लिंग वेगळे आहेत. विभिन्न प्रकारच्या सापांचे ,जलचरांचे ,मासोळ्यांचे आणि आकाशात उडणाऱ्या पक्षांचे लिंग वेगवेगळे आहेत. अशा प्रकारची जातिचिन्ह मनुष्यात वेगवेगळी नसतात. दुसऱ्या प्राण्यांच्या शरीर संरचनेत त्यांच्या शरीराचे प्रत्येक अंग वेगवेगळ्या प्रकाराचे असते. जेव्हा की सर्व मनुष्यांच्या शरीराची सर्व अंगे वेगवेगळ्या प्रकाराची नसतात, एकाच प्रकाराची असतात.

मनुष्यात भेद फक्त बाहेरील ओळखीत आहेत. जो मनुष्य गोपालनाने जीविका करतो तो कृषक असतो. जो ओझे वाहतो तो मजूर असतो. जो मनुष्य एखाद्या कलेने, कारागिरीने जीविका चालवतो, तो आपआपल्या कामानुसार कुंभार, लोहार, सुतार इत्यादी म्हणविला जातो. जो मनुष्य दुसऱ्यांचे धन चोरून जगतो तो चोर आहे. शस्त्रांच्या सहायाने जीविका अर्जित करतो ,तो सैनिक म्हणविला जातो. जो गाव-जमिनीचा उपभोग करून जगतो तो राजा असतो. ह्या पैकी कोणीही ब्राम्हण नाही.

त्यानंतर भगवानांनी सांगितले की एखादा मनुष्य एखाद्या विशिष्ट मातेपासून उत्पन्न होण्यामुळेही ब्राम्हण होत नाही. त्यांनी पुढे सांगितले की कशाप्रकारच्या गुणांना धारण करण्यामुळे कोणी व्यक्ती ब्राम्हण होते:--

जो संग्रही नाही, अपरिग्रही आहे, जो सोबत (संग) आणि आसक्तिपासून विरत आहे, साऱ्या भवसंयोजनांना नष्ट करून निर्भय झाला आहे, ज्याने क्रोध आणि तृष्णेला मनातून काढून टाकले आहे, ज्याने त्या काळच्या प्रचलित ६२ प्रकारच्या विभिन्न मान्यतांच्या बंधनांना तोडले आहे, त्याला मी ब्राम्हण म्हणतो.

ब्राम्हण मी त्याला म्हणतो जो आपल्या चित्ताला दूषित केल्याविना अपमान आणि पीडा सहन करतो, क्षमाच ज्याचे बळ आहे, जो अक्रोधी, व्रती, शीलवान, बहुश्रुत, संयमी आणि अंतिम शरीरधारी असतो, जो कमळाच्या पानावरील जलाप्रमाणे भोगात लिप्त होत नाही, ज्याची आसक्ती - व्देष, ईर्ष्या, अहंकार तसेच गळून गेलेले आहेत जसे सुईच्या टोकावरून मोहरीचे दाणे, ज्याने ह्याच जन्मात आपल्या दु:खांचा विनाश करून आपल्या ओझ्याला उतरवून फेकले आहे, जो गंभीर प्रज्ञावान, मेधावी, मार्ग, अमार्गाचा ज्ञाता, सत्यवान आहे, जो गृहस्थ व गृहत्यागी दोघातही लिप्त होत नाही; जो कोणत्याही प्राण्याची हत्या करीत नाही, न हत्येसाठी कोणालाही प्रेरित करतो,जो विरोधींमध्ये विरोधरहित आणि दंडधारींमध्ये दंडरहित,संग्रहींमध्ये संग्रहरहित आहे, जो आदरयुक्त,मृदू व सत्य वाणी बोलतो, ज्यामुळे कोणालाही पीडा होऊ नये, अशा गुणांनी संपन्न व्यक्तीलाच मी ब्राम्हण म्हणतो.

ह्याच प्रकारे भगवानांनी ब्राम्हणांच्या गुणांची अजून व्याख्या केली जो पुरूष जगात न दिलेल्या वस्तू घेत नाही,जो लोक आणि परलोकांच्या विषयात आसक्तीरहित आहे,ज्याने परमसत्याला जाणले आहे,जो निर्वाण (मोक्ष) चा मार्ग सांगणारा आहे, जो शोकरहित, निर्मल आणि शुद्ध आहे,जो पाप-पुण्य दोघांच्याही प्रती आसक्तीरहित आहे, ज्याची सर्व जन्मांची तृष्णा नष्ट झाली आहे,ज्याने जन्म-मरणाच्या चक्रात टाकणाऱ्या मोहाचा त्याग केला आहे,जो भोगांना सोडून संन्यासी झाला आहे,जो लोकिय आणि दिव्य कोणत्याही बंधनात आसक्त नाही,जो रती आणि अरती यांना सोडून शीतल स्वभावाचा व क्लेशरहित आहे,अशा सर्वलोक विजयी असलेल्या मी ब्राम्हण म्हणतो, जो प्राण्यांच्या मृत्यू आणि उत्पत्तीला उत्तम प्रकारे जाणतो, जो आसक्तीरहित सुगत आणि बोधियुक्त (ज्ञानी) आहे, त्याला मी ब्राम्हण म्हणतो, ज्याची गती देव, गंधर्व आणि मनुष्य जाणत नाहीत, जो क्षीणास्रव आणि अरहंत आहे, ज्याच्या पूर्व, पश्चात आणि मध्यात काहीही नाही, जो संचयी नाही, जो पूर्व जन्मांना जाणतो, स्वर्ग आणि नरकास पाहातो, ज्याचा पुनर्जन्म क्षीण झाला आहे, ज्याची सारी कृत्ये समाप्त झाली आहेत, जो अभिज्ञानी मुनी आहे, मी त्याला ब्राम्हण म्हणतो.

जन्माने न कोणी ब्राम्हण होतो, न जन्माने अब्राम्हण. कर्मानेच ब्राम्हण होतो आणि कर्मानेच अब्राम्हण. कर्माने कृषक होतो, कर्माने कारागीर, कर्माने वैश्य होतो आणि कर्मानेच मजूर. कर्माने चोर होतो आणि कर्मानेच सैनिक. कर्माने याचक होतो आणि कर्मानेच राजा. ह्याच प्रकारे कर्म-फळाला जाणणारा पंडित ह्या जन्माला यथार्थपणे जाणतो. लोक कर्माने चालत आहे, प्रजा कर्माने चालत आहे. चालणाऱ्या रथाच्या चाकाच्या धुरे प्रमाणे प्राणी कर्माने बांधलेले आहेत. तप, ब्रम्हचर्य, संयम आणि दमन ह्यामुळे ब्राम्हण होतो, ह्या गुणांना धारण करणाच 'उत्तम ब्राम्हण' होतो.

ते दोघे तर युवक होते,परंतु ब्राम्हण समाजाचे जास्त वय असणारे लोकही ह्या विषयावर चर्चा करीत असत.

भगवान बुद्धांच्या जीवनकाळातील एक घटना, एकदा जेव्हा ते अनाथपिंडिकच्या जेतवनात थांबले होते, तेव्हा श्रावस्तीत भिन्न भिन्न स्थानांवरून आले ५०० ब्राम्हण तेथे एकत्र झाले. त्यांच्यात ही चर्चा सुरू झाली की गौतम उच्च-नीचचा भेदभाव करीत नाही. नीच पेक्षाही नीच जातीच्या व्यक्तीलाही धर्म शिकवितो आणि पूज्य बनवितो. आम्ही त्याच्याशी ह्या विषयावर विवाद करू शकत नाही.

त्या ब्राम्हणांतील एक आश्वलायन, युवक असुनही वैदिक ग्रंथात पारंगत होता. असे वाटते की हाच आश्वलायकन पुढे जाऊन उपनिषद काळाचा पंडित झाला असावा. त्यामुळे ब्राम्हणांनी आश्वलायनाला ह्या लायक समजले आणि त्याला ह्या विषयावर गौतम बुद्धांशी वाद करण्यासाठी तयार केले. तरीही तो वारंवार म्हणत होता की बुद्ध धर्मवादी आहे,त्याच्याशी विवाद करणे कठीण आहे. परंतु त्या ब्राम्हणांच्या दबावामुळे आश्वलायन बुद्धांशी विवाद करण्यासाठी तयार झाला.

जेव्हा तो बुद्धांना भेटला तेव्हा तो म्हणाला की ब्राम्हण वर्णच श्रेष्ठ आहे, अन्य वर्ण हीन आहेत, ब्राम्हण शुक्लवर्णी आहेत, अन्य लोक कृष्णवर्णी. ब्राम्हण वर्णच शुद्ध असतो, अब्राम्हण वर्ण नाही. ब्राम्हण ब्रम्हाचे औरस पुत्र आहेत,त्याच्या मुखातून उत्पन्न झाले आहेत, तेच ब्रम्हाचे वास्तविक उत्तराधिकारी आहेत.

तेव्हा भगवान म्हणाले- आश्वलायन!. ब्राम्हणांच्या स्त्रियाही ऋतुमती, गर्भवती होतात,मुलांना जन्म देतात, त्यांना दूध पाजतात. मग हे कसे मानावे की ते ब्रम्हाच्या मुखाद्वारे उत्पन्न झाले आहेत?

आश्वलायन निरूत्तर झाला.

आणि कोण्या ब्रम्हाने मनुष्य जातीत उच्च-नीचतेचे विधान केले असेल तर शेजारी देशात आणि भारताच्या अन्यान्य सीमांत प्रदेशात-आर्य आणि दास दोनच वर्ण का असतात? तेथे कोणी आर्य असेल तर तो दास होऊ शकतो आणि दास असेल तर आर्य होऊ शकतो. आश्वलायनाने हे स्वीकारले की त्या देश-प्रदेशात असे होते.

तेव्हा भगवानांनी म्हटले की कोणत्या विशेषतेमुळे ब्राम्हण आपल्या स्वतःला ब्रम्हाचा उत्तराधिकारी मानतात?

आश्वलायनाजवळ ह्याचे उत्तर नव्हते.

त्यानंतर भगवान म्हणाले की कोणी क्षत्रिय आहे, परंतु हिंसक आहे, चोर आहे, व्यभिचारी, कटू-भाषी आहे-तर तो मरणानंतर नरकातच जाईल. ह्याच प्रकारे वैश्य आणि शुद्राचीही वाईट गतीच होईल. तर मग अशाच दुर्गुणांनी युक्त ब्राम्हण नरकात जाणार नाही काय?

आश्वलायना जवळ ह्याचे काहीही उत्तर नव्हते.

असेच कोणी व्यक्ती जर सदाचारी असेल तर मरणानंतर तो स्वर्गगामी होईलच,मग ती कोणत्याही जातीचा असो.

आश्वलायन निरूत्तर होता.

भगवान म्हणाले की कोणी व्यक्ती ब्राम्हण असो अथवा अब्राम्हण नदी घाटावर साबण घेऊन आपल्या शरीराचा मळ काढण्यात समर्थ आहे, तर मग ह्यात ब्राम्हणाची काय विशेषता आहे? असेच माझ्याजवळ आल्यावर कोणत्याही जातीचा व्यक्ती आपल्या मनाचा मळ उतरवून धार्मिक, होऊ शकतो. आवश्यक नाही की तो ब्राम्हण जातीचा असावा. शीलवान, धार्मिक होण्याचा सर्वांना अधिकार आहे आणि असे झाल्यावर सर्वांना एकसारखेच फळ मिळते. अशा साधकालाच मी उत्तम ब्राम्हण म्हणतो. कोणीही साधक, कोणत्याही जाती वा वर्णाचा असो,तो तप, ब्रम्हचर्य, इंद्रीय-संयम व चित्त दमनाद्वारेच ब्राम्हण म्हणविण्याचा अधिकारी होतो. अशा साधकालाच 'उत्तम ब्राम्हण' म्हणतात. नीच कुळात जन्मलेल्या व्यक्तीही आपल्या आचरणाने शुद्धी प्राप्त करू शकतात.

आश्वलायन पुन्हा निरूत्तर होता.

जर कोणी ब्राम्हण युवक अब्राम्हण युवतीशी विवाह करेल अथवा कोणी अब्राम्हण युवक कोण्या ब्राम्हणीशी विवाह करेल आणि त्यामुळे जी संतती होईल त्याला काय म्हणाल? श्रेष्ठ वर्ण अथवा नीच वर्ण?

आश्वलायन निरूत्तर होता.

एखादया घोड्याचा गाढवीशी संयोग झाला तर त्यांच्या संततीला न घोडा म्हणतात न गाढव, त्याला खेचर म्हणतात. असेच ब्राम्हण आणि अब्राम्हणच्या संततीला काय म्हणाल? त्याला ब्राम्हण म्हणून श्रेष्ठ म्हणाल अथवा अश्रेष्ठ? कसा भेद कराल? मनुष्य मनुष्य आहे. कोणताही भेदभाव नाही. ब्राम्हण वर्णाचा असो अथवा अन्य वर्णाचा, शीलवान धार्मिक होण्याचा सर्वांना अधिकार आहे आणि सर्वांना एकसारखे फळ मिळते.

दुर्भाग्याने देशात बुद्धांच्या हजारो वर्ष आधीपासूनच जात-पात, उच्च-नीच, शिवाशीवीचा कलंक खूप पुरातन काळापासून चालत येत होता. कोणी चांडाळ दिसल्यावर अशुभ मानले जात होते. त्याला स्पर्श करणे तर दूरच त्याची सावलीही पडली तरी स्नान करावे लागे. म्हणून जेव्हा कोणी चांडाळ अन्य मनुष्यांच्या समुहात येत असे तेव्हा तो टाळ्या वाजवित, घंटीचा आवाज करीत येत असे, ज्यामुळे लोक आधीच त्याच्यापासून दूर होवोत. एखाद्या चांडाळाचे दिसणेही अशुभ मानले जात असे. त्यामुळे चांडाळ दिसल्यावर तर काही जण सुगंधित द्रव्याने आपल्या डोळ्यांना धूत असत. बहुदा चांडाळाची सावली पडल्यावर लोक त्याला मारीत असत. चांडाळ नजर खाली करूनच गावात प्रवेश करीत असत.

ह्यामुळे वाटते की बुद्धांच्या नंतरही चांडाळ मृत शव वाहून नेण्याचे स्मशानाची रक्षा करण्याचे काम करीत होते आणि चांडाळांना राहण्यासाठी वेगळे गाव होते. मृत्युनंतर त्याला जाळण्यासाठी स्मशानही वेगळे असायचे.

चांडाळ लोकांच्या अतिरिक्त अनेक अन्य जातींनाही नीच मानले जात होते. हे हीनकुळ होते– नोसादकुळ म्हणजे बांबूची टोपली बणविणारे. चर्मकारकुळ म्हणजे मेलेल्या पशूच्या चामडीने वस्तू बनविणारे. पुक्कुसकुळ म्हणजे घाण, कचरा उचलणारे भंगी.

चांडाळ कुळाचे व्यक्ती वृषल मानले जात होते. भगवानांनी खऱ्या अर्थाने वृषल कोण असतो, ह्याचे विवरण दिले– जो नर क्रोधी, वैरी, पापी, ईर्ष्याळू, मिथ्यामतधारी, मायावी आहे; जो हिंसक, अत्याचारी, चोर आणि व्यभिचारी आहे; जो वृद्ध माता-पित्याचे पालन-पोषण करीत नाही; दुसऱ्याला त्रास देतो; ब्राम्हण, श्रमण वा अन्य याचकांना धोका देतो; अनर्थकारी बोलतो; पापकर्म करून लपवतो; आपली बढाई आणि दुसऱ्याची अवहेलना करतो; रूष्ट, खूप जेवणारा, वाईट इच्छा असणारा, कंजूस आणि शठ आहे; वाईट कर्म करण्यात लज्जा, भय मानीत नाही; जो अरहंत नसतानाही आपल्याला अरहंत म्हणतो, तो अधम, वृषल आहे. कोणी जन्माने वृषल होत नाही आणि जन्माने ब्राम्हण होत नाही. कर्मानेच वृषल होतो आणि कर्मानेच ब्राम्हण. अकुशल कर्म करणारा ब्राम्हण चांडाळासमान होतो.

भगवान म्हणाले– "मी ब्राम्हणी मातेपासून उत्पन्न होण्यामुळे कोणाला ब्राम्हण म्हणत नाही. ज्याच्याजवळ काहीही नाही आणि जो काहीही घेत नाही; त्याला मी ब्राम्हण म्हणतो. न जटेने, न गोत्राने, न जन्माने ब्राम्हण होतो; ज्याच्यात सत्य आणि धर्म आहे, तोच पवित्र आहे, आणि तोच ब्राह्मण आहे."

भगवानांनी नेहमी जातीपेक्षा विद्या आणि आचरण दोघांनाच महत्व दिले आणि ह्यावरच जोर दिला.

या साधकांनो! आम्हीही भगवानांच्या ह्या पावन शिकवणुकीपासून प्रेरणा घेऊन आपले आचरण व कर्म सुधारून खऱ्या अर्थाने ब्राम्हण बनू.

कल्याणमित्र
सत्यनारायण गोयन्का

### अतिरिक्त उत्तरदायित्व

**भिक्षु आचार्य** -- १. भदंत उ. रतनपालजी, श्रीमती रतवत्ते सहित श्रीलंकेच्या सर्व केंद्र आचार्यांना मार्गदर्शन व सहयोग.

### आचार्य

१. श्री विमलचंदजी सुराना, जयपुर. प्रमुख आचार्यांची सहायता
२. कु. प्रीति डेढिया, मुंबई. विपश्यना विशोधन विन्यासच्या टेप विभाग व वेबसाइट ची सेवा
३. श्री अरुण सूर्यवंशी, नाशिक. सहायक आचार्यांच्या ट्रेनिंग मध्ये सहायता
4. Mr. Vitcha Klinpratoom, To assist Centre Teacher in serving Dhamma Canda Pabhā, Thailand
5-6. Dr. Khin Maung Aye & Dr. Daw Kyi Sein, UK, To conduct courses in Prisons
7. Ms. Andrea Schmitz, Germany, To assist Ms. Floh Lehmann to serve Ukraine

### वरिष्ठ सहायक आचार्य

१-२. श्री रामकृष्ण व श्रीमती सरोज बांते, धम्म वसुधा, वर्धाच्या केंद्र-आचार्यांची सहायता
३. श्री रामदयाल असावा, धम्म सुवत्थि, श्रावस्ती च्या केंद्र-आचार्यांची सहायता
४-५. श्री राजकुमार व श्रीमती सरोजिनी चौहान, धम्म लक्खन, लखनऊच्या केंद्र-आचार्यांची सहायता
६. श्री प्रेमचंद सुंगर, धम्मधज, होशियारपुरच्या केंद्र-आचार्यांचीची सहायता
७. श्री रोहणीकांत शर्मा, धम्मविपुल, मुंबईच्या केंद्र-आचार्यांची सहायता
८. श्री भिंबार सिंह थापा, धर्मशृंग, नेपाळच्या केंद्र-आचार्यांची सहायता
9. Mr. Martin Haig, To assist the Centre teacher in serving Dhamma Āloka, Australia
10. Ms. Anna Schlink, To assist the centre Teachers in serving Dhamma Passaddhi, Australia
11. Ms. Puangpaka Bunnag, To assist the centre Teachers in serving Dhamma Sīmanta; Thailand
12-13. Mr. Arthur Rosenfeld & Mrs. Ana Teixido, the Netherlands To assist Mr. Chris Weeden to serve the Netherlands
14-15. Dr. Teun Zuiderent-Jerak- & Mrs. Sonja Jerak-Zuiderent, The Netherlands, To assist Ms. Floh Lehmann to serve Slovenia
16. Mrs. Yenta Trainate, To assist the center teacher in serving Dhamma Dhani, Bangkok, Thailand

### सहायक आचार्य

१ श्री अनिल कुमार मौर्य, धम्मचक्क, सारनाथच्या केंद्र- आचार्यांची सहायता
२. डॉ. पवन गुडला, धम्म नागाज्जुन, नालगोडाच्या केंद्र-आचार्यांची सहायता
३. श्री सर्वेश्वर, धम्म कोण्डञ्ञ, कोंडापुर, केंद्र-आचार्यांची सहायता

### नवे उत्तरदायित्व

### आचार्य, धर्मप्रसारण सेवा

१. श्री एस. अडवियप्पा, जयपुर
२-३. श्री मुकुंदराय व श्रीमती विमला बदानी, कोलकाता
४. डॉ. राजेंद्र चोखानी, मुंबई
५. श्री के. बी. चिकनारायणप्पा, बंगलूरू
६. श्री एल. शिवप्पा, बंगलूरू
७. श्री सुधाकर फुंदे, मुंबई
८. डॉ. एन. पी. सुब्रमण्यम, सिकंदराबाद
९. श्रीमती शांताबेन ठक्कर, गांधीधाम
१० श्रीमती जगदीशकुमारी सिंह, जयपुर
११. कु. ए. गायत्री बालकृष्णनन, इगतपुरी
१२. श्री दिगंबर धांडे, मुंबई. धर्मप्रसारणची सेवा, (केन्द्रा बाहेर शिबिर लावून)
१३-१४. श्री आनंदराज व श्रीमती नानी मैजू शाक्य, नेपाल
15. Mr. Atsushi Itagaki, Japan
16. U Tin Maung Shwe, Myanmar
17-18. Mr. Heinz Bartsch & Mrs. Brunhilde Becker, Germany
19-20. Dr. Tian-Ming Sheu & Dr. (Mrs. ) Yuh-Wen Wang, Taiwan

### आचार्य, केंद्र दायित्त्व

१. डॉ. निखिल मेहता, धम्मपुण्ण, पुणे
२. श्री बाबूराव शिंदे, धम्मअजय, चंद्रपुर
३. श्री प्रकाश महाजन, धम्मसरोवर, धुळे व धम्मभूसन, भुसावल
४. श्री भानुदास रसाळ, धम्मछत्तपति, फल्टन
५. श्रीमती मनमोहिनी रस्तोगी, धम्मपट्ठान, सोनीपत
६. श्री रामनिवास गौतम, धम्मकारुणिका, करनाल
७. श्री प्रमोद भावे, धम्मलद्ध, लद्दाख
८. श्री अशोक कुमार नागपाल, धम्मसलिल, देहरादून
९. श्री कृष्णलाल शर्मा, धम्मधज, होशियारपुर, पंजाब
१०. श्रीमती बीना मेहरोत्रा, धम्मचक्क, सारनाथ
११. श्री रुद्रदत्त तिवारी, धम्मलक्खन, लखनऊ
१२. श्रीमती प्रमिला शाह, धम्मबल, जबलपुर
१३. श्रीमती शीला केला, धम्ममालवा, इंदौर
१४. श्री बिक्रम डांडिया, धम्मबोधि, बोधगया
१५. श्री मोहन दीवान, धम्मपुब्बोत्तर, मिजोरम
१६. श्री अनंत जेना, धम्मभुबनेश्वर, उड़ीसा
१७. श्री वी. संथनगोपालन, धम्मसेतु, चेन्नई
१८. श्रीमती जया संगोई, धम्मपफुल्ल, बंगलूरू
१९. श्रीमती रेणुका मेहता, धम्ममधुरा, मदुराई.
20-21. Mr. Roy Menezes & Mrs. Suleka Puswella, Dhamma Vaddhana, USA
22-23. Mr. Christian & Mrs. Rosi Hild, Dhamma Sumeru, Switzerland
24. Mrs. Nani Chhori Bajracharya Dhamma Janani, Nepal
25. Mr. Narayan Prasad Tiwari, Dhamma Citavana, "
26. Mr. Adi Ratna Shakya, Dhamma Kitti, "
27. Mr. Sheel Bahadur Bajracharya, Dhamma Pokhara, "
28. Mr. Francois Kuoch, Dhamma Latthika, Combodia
29-30. Mr. Gregory & Mrs. Irene Wong, Dhamma Mutta, Hong Kong
31-32. Mr. Derek & Mrs. Yukiko Phillips, Dhamma Bhanu, Japan
33. U Thein Htwe, Dhamma Ratana, Myanmar
34-35. Dr. Maung Maung Aye & Daw Yi Yi Win, Dhamma Makuta, "
36. Daw Nyo Nyo Win, Dhamma Manorama "
37. Daw Myat Lay Khaines, Dhamma Mahima, "
38-39. U Htin Aung & Daw Khin Myint May, Dhamma Manohara "
40-41. U Kyi Thein & Daw Tin Tin Yee, Dhamma Mahapabbata "
42. Dr. U Thein Tun, Dhamma Mayuradipa "
43-44. Dr Myo Aung & Daw Khin Than Hmi, Dhamma Pabbata "
45-46. U San Lwin & Daw Tin Tin Naing, Dhamma Hita Sukha Geha "
47. Miss Komudhi Mendis, Dhamma Kuta, Sri Lanka
48. Mr. D. H. Henry, Dhamma Anuradha, Sri Lanka
49. Mr. Ping-San Wang, Dhamma Vikasa, Taiwan
50-51. Mr. Vichit & Mrs. Pornphen Leenutaphong, Dhamma Kañcana, Thailand
52. Ms. Juechan Limchitti, Dhamma Porano "
53. Mrs. Patra Patrabutra, Dhamma Canda Pabha "
54. Mr. German Cano & Mrs. Martha Molina, Dhamma Makaranda, Mexico
55. Ms. Mirjam Berns, Dhamma Venuvana, Venezuela
56. Ms. Macarena Infante, Dhamma Pasanna, Chile
57. Mr. Sean Salkin, Dhamma Aloka, Australia

### वरिष्ठ सहायक आचार्य, केंद्र दायित्त्व

१. श्री शिवाजी वानखेडे, शेगांव, *धर्मप्रसारणाची सेवा*
२. श्री दिनेश देशमुख, धम्मगोंद, गोंदिया
३. श्री प्रभुदयाल सोनगरा, धम्ममरुधरा, जोधपुर,
४. श्री हरिलाल साहू, धम्मउत्कल, उड़ीसा
५. श्री सुधाकर खैरे, धम्मकेतु, दुर्ग (छत्तीसगढ़)
६. डॉ. ईश्वरचंद सिन्हा, धम्मलिच्छवी, मुजफ्फरपुर
७. श्री पी. रवींद्र रेड्डी, धम्मखेत्त, हैदराबाद
८. डॉ. सत्यनारायण सहा, धम्मनिज्झान, निजामाबाद
९. श्री बी. वी. सत्यनारायण राजू, धम्माराम, भीमावरम
10. Mr. Sergio Borsa, Dhamma Atala, Italy
11. Daw Mi Mi Myine, Dhamma Mandapa, Myanmar
12. U Ba Than, Myanmar, Dhamma Nanadhaja, "
13. U Maung Maung Sein, Dhamma Mitta Yana, "
14-15. U Kyaw Thu & Daw Kyi Kyi Tun, Dhamma Rakkhita, "
16. U Ko Ko, Dhamma Vimutti, "
17. Mr. T. A. Piyasena, Dhamma Sobha, Sri Lanka

### नव नियुक्ती

#### सहायक आचार्य

१. श्री नरेंद्र कडगे, जयसिंगपुर
२. श्रीमती एम. आर. राजेश्वरी, भिलाई
3. Mr. Laurent Thijs, Belgium
4. Mr. Robert Freese, Ireland
5. U Maung Maung Lwin, Myanmar

## आवश्यकता आहे पगोडामध्ये सुयोग्य मार्ग-दर्शकांची

पगोडा पाहायला येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याना योग्यरीत्या समजाविणे, दाखविणे इत्यादींसाठी खूपच मृदूभाषी, सुभाषी, समजाविण्यात निपुण, सुयोग्य मार्गदर्शकांची मोठ्या संख्येने आवश्यकता आहे. साधकाने कृपया स्वतःबाबत स्वतः तपासून पूर्ण विवरणासहित खालील ईमेल अथवा फोनवर त्वरित संपर्क साधावा. येण्या-जाण्याचा खर्च, भोजन,विश्राम,सेवा आणि ध्यान-भावनेचा लाभ मिळेल फोनः ०२२-२८४५१२०४, (९१) २२-३३७४७५०१ (३० लाइन्स), **ईमेलः** pr@globalpagoda.org

## दभाड (नांदेड) येथे बृहद आनापान शिबीरांचे आयोजन

नांदेड शहरापासून जवळपास १४किमी. दूर असणाऱ्या दभाड नावाच्या गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पीपल्स एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली होती. ह्याचे वर्तमान अध्यक्ष डॉ. एस पी. गायकवाड यांनी १९८८मध्ये येथे एका धम्म परिषदेची स्थापना केली ज्याच्या प्रथम अधिवेशनात पुज्य भदंत आनंद कौशल्यायनजींच्या अध्यक्षतेत मुख्य वक्त्याच्या रूपाने पूज्य गुरुजींनी एका तासाचे प्रवचन दिले होते. तेव्हापासून ही परिषद प्रत्येक वर्षी धर्माच्या सैद्धांतिक पक्षाला उजागर करीत राहिली. मागील २७ जानेवारीला परिषदेने २६व्या अधिवेशनात पूज्य गुरुजींच्या वाणीत अर्ध्या तासांचे आनापान सत्र आयोजित केले, जे जवळपास ४५-४६ हजार लोकांद्वारे ग्रहण केले गेले. इतकी मोठी संख्या असूनही पूर्ण मंडपात अखंड शांती कायम होती आणि शेवटी लोकांनी प्रथमच धर्माची व्यावहारिक शिकवण प्राप्त करून खूप प्रसन्नता व्यक्त केली.

दभाड व्यतिरिक्त अन्य क्षेत्रातून भिक्षू आचार्य व स. आचार्यांच्या माध्यमाने मोठ्या संख्येने आनापान शिबिराचा लाभ घेण्याचे समाचार येत आहेत. ह्यामुळे वाटते की खरोखरच धर्माचा डंका वाजला आहे आणि हा साऱ्या भारतात व विश्वात खूप जोरात पसरेल.

## ग्लोबल पगोड्यात (परियत्ति आणि पटिपत्ति) पालि पाठ्यक्रम-२०१३

**आवासीय पाठ्यक्रमः-- ९० दिवसीय : पालि-इंग्रजी; अवधी -** १-७-१३ ते ३०-९-१३ पर्यंत; आवेदनची तिथी-१५-५-१३ पर्यंत आवेदन पत्र– www.vridhamma.org ने ही पाठवू शकतात. **संपर्कः** विपश्यना विशोधन विन्यास (VRI), ग्लोबल विपश्यना पगोडा, एस्सेल वर्ल्डच्या जवळ, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९१.

## बुद्धशिकवण आणि विपश्यनावर एक वर्षीय पाली डिप्लोमा कोर्स

वी आर आय व मुंबई विश्वविद्यालयाच्या दर्शन-विभागाच्या संयुक्त उपक्रमाअंतर्गत वर्ष १३-१४ मध्ये **इंग्रजी माध्यमातून पाली डिप्लोमा कोर्स** आयोजित केला गेला आहे, ज्यात भगवान बुद्धांच्या शिकवणुकीतील सिद्धांतीक व व्यावहारिक पक्षांचे निरूपण केले जाईल. **स्थळ –** ज्ञानेश्वर भवन, दर्शन विभाग, मुंबई विश्वविद्यालय विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व) मुंबई -४०००९८. **आवेदन पत्र –** वरील ठिकाणी उबलब्ध – १ ते १५ जुलै सोमवार ते शुक्रवार, ११. ३० ते २. ३० वाजेपर्यंत. **कोर्स कालावधी –** २०/७/१३ ते ३१/३/१४ **वेळ–** दुपारी २. ३० ते संध्या ६. ३० वाजेपर्यंत, **योग्यता–** कमीतकमी १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच दिवाळीच्या सुट्टीमध्ये विपश्यना शिबिरात भाग घेणे आवश्यक असेल. **अधिक माहितीसाठी संपर्क करा–** डॉ शारदा संघवी – फोनः ०२२- २३०९५४१३, मो. ०९२२३४६२८०५, **ईमेलः** s_sanghvi@hotmail.com; २) श्रीमती बलजीत लाम्बा: फोनः ०९८३३५१८९७९; ३) अलका वेंगुलकरः मो.– ०९८२०५८३४४०.

## बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने
## पूज्य गुरुदेवांच्या सान्निध्यात एक दिवसीय महाशिबिर

२५ मे, २०१३, **शनिवार**, वेळः सकाळी ११ वाजेपासून दुपारी ४ वाजेपर्यंत, **'ग्लोबल विपश्यना पगोडा' च्या** मोठ्या धम्मकक्षा (डोम) मध्ये. कृपया लक्ष द्यावे की ह्या विशाल शिबिरात आपल्याला कोणत्याही प्रकारची असुविधा होऊ नये यासाठी **बुकिंग केल्याविना येऊ नये. बुकिंग संपर्कः फोन नं. 022-28451170 / 022-33747501- Extn. 9, 022-33747543 / 33747544,**
**(फोन बुकिंग :** प्रातः **11** से सायं **5** तक, प्रतिदिन)
**ईमेल Regn: oneday@globalpagoda.org**
**Online Registration: www.oneday.globalpagoda.org**

## दोहे धर्माचे

**संप्रदायच्या बेड्या, जातिपाती बंधन।**
**धर्मचक्रानेच तुटले, दूर हो भव दुख पण॥**

**जात-पातिच्या फेऱ्यात, सुटे धर्माचा सार।**
**सार सोडता निसारच, हो डोयीचा भार॥**

**जात-पात कुल गोत्र वा, वर्ण-भेद न राहे।**
**चाखे जो जो धर्म रस, तो तो सुखी आहे॥**

**दुष्कर्मांच्या पंथावर, शुद्ध हरवे सारी।**
**धर्म मिळे तर सुख मिळे, तुटे दुख पाश भारी॥**

**धर्म मिळे तरच तुटती, अपराध पाश जाण।**
**मानस प्रकाशित होय, मुक्त चंद्रा समान॥**

## दोहे धर्माचे

**ब्राम्हण हो वा वैश्य, क्षत्रिय वा शूद्र होय।**
**पालन करी शुद्ध धर्म, तो चित्त शुद्ध होय॥**

**जात पात भेदानेच, मनुष्य हो बेहाल।**
**धन्य! धन्य! धर्म गंगा, न्हाला तोच निहाल॥**

**जाती वर्ण गोत्राचा, जिथे भेद ना होय।**
**सगळ्यांचे मंगल करे, सत्य धर्म हा होय॥**

**जात-पातच्या कोडात, धनि-निर्धनची खाज।**
**सम बुद्धी ज्या दिनी मिळे, त्याच दिनी सुख राज॥**

**धर्म ना हिंदू बौद्ध, शिख ना मुस्लिम जैन।**
**धर्म चित्ताची शुद्धता, धर्म शांति सुख चैन॥**

**कथनी करणी ह्यामध्ये, भेदभाव न जाणे।**
**म्हणे जात कर्मानेच, जन्मजातच माने॥**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712,
243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org